
NEHRU BAL PUSTAKALAYA

# गमतीदार भुते


गीता अय्यंगार

अनुवाद : क. दि. सोनटक्के

चित्रे : पुलक विश्वास

ISBN 81-237-3541-3

पहिली आवृत्ती : 2001 *(शके* 1923)

दुसरी आवृत्ती : 2003 *(शके* 1924)

मूळ © गीता अय्यंगार, 1998

मराठी अनुवाद © नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, 2001

**रु. 17.00**

Cheerful Spirits *(Marathi)*

संचालक, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, ए-5 ग्रीन पार्क
नवी दिल्ली-110 016 यांनी प्रकाशित केले.

नेहरू बाल पुस्तकालय

# गमतीदार भुते


गीता अय्यंगार

अनुवाद : क. दि. सोनटक्के

चित्रे : पुलक विश्वास



नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया



# नवा मित्र

एके दिवशी सकाळी प्रियाने खिडकीबाहेर पाहिले तर तिला शेजारच्या घराच्या पाठीमागच्या अंगणात एक मुलगा उभा असलेला दिसला. तिला एकदम बरे बरे वाटले. आपल्या या नव्या घरात राहायला येऊन तिला आठवडाच झाला होता. साहजिकच इथले मित्रमैत्रिणी जमवायला तिला अजून जमले नव्हते. शाळेतले कोणी म्हणावे तर तेव्हा उन्हाळ्याच्या मोठ्या सुटीचा तिसरा आठवडा चालला होता. ती अगदी कंटाळून गेली होती.

अंगात टी-शर्ट आणि गुडघ्याच्या थोडी खाली येणारी बर्मुडा पद्धतीची चड्डी त्याने घातली होती. अंगणाच्या एका कोपऱ्यात तो काहीतरी टोकरत होता. त्याच्या घराभोवती बाग आहे असे काही म्हणता आले नसते. कारण सगळे अंगण नुसते उंच उंच वाढलेल्या गवताने भरल्यासारखे वाटत होते. तो मुलगा खाली काहीतरी पाहत होता आणि खणतही होता. काही काही वेळी तो दगडही हलवायचा आणि अधूनमधून आपल्या दंडावर किंवा पायांवर चापट्याही मारायचा. हे थोडेसे मजेशीर वाटत होते. पण हेही खरे की तेव्हा तो एखादेवेळी डासांना दूर घालवायचाही प्रयत्न करत असेल.

प्रिया धावतच घरातून बाहेर पडली आणि त्यांच्या दोन्ही घरांच्यामध्ये असलेल्या कुंपण भिंतीजवळ गेली.

''एऽऽ, एऽऽ,'' प्रियाने तेथूनच हाक मारली.

पण ती त्याच्या कानावरच पडली नाही. तो आपला तसाच कमरेवर हात ठेवून खालचे दगड सरकवीत राहिला.

''एऽऽ, अरे एऽऽ,'' प्रियाने पुन्हा हाक मारली. यावेळी त्याला ती ऐकू गेली आणि त्याने आजूबाजूला पाहिले.

''तू काय करतोयस?'' प्रियाने विचारले.

''घुशीनं किंवा अशाच कोणीतरी इथं बोगदा खणलाय. तो किती लांब आहे हे मी पाहतोय. तुला पाहायचाय? ये इकडं.''

आपल्या आयुष्यात प्रियाने आजपर्यंत तरी असे उंदराचे किंवा घुशीचे बीळ पाहायचा प्रयत्न केला नव्हता. किंवा, खरे म्हणजे, आपण असे काही करावे असे आजपर्यंत तिला कधी वाटलेच नव्हते. त्यामुळे आणि आता त्याबाबत आमंत्रणच मिळाले असल्यामुळे ते आपण करून पाहावे असे तिला वाटले. मधली भिंत चढून ती खाली उतरली आणि त्याच्याकडे गेली.

वाढलेल्या गवतात तेथे एक बीळ होते. तिने त्यात वाकून पाहिले तर तिला तेथे पुढे रूंद झालेला आणि त्यापुढे दुभंगणारा बोगदा दिसला.

''आणि घूस आपल्या अंगावर चालून आली म्हणजे?'' ती म्हणाली.

''तसं मुळीच होणार नाही,'' तिचा नवा मित्र म्हणाला. ''तिला माहितीय आपण इथं आहेत ते.''

प्रिया वाकल्याची उभी झाली आणि तिने आजूबाजूला त्याच्या घराकडे पाहिले. ते तसे जुनेपुराणे वाटत होते. तिच्या नव्या घराप्रमाणे नाही. तिचे घर नुकतेच बांधलेले होते. ते नवे कोरे दिसत होते एवढेच नाही तर त्याला अजून नवेकोरेपणाचा वाससुद्धा येत होता!

''तुझं नाव काय?'' प्रिया म्हणाली.

''हर्ष,'' तो म्हणाला.

''तुझं नाव काय?'' प्रियाने पुन्हा विचारले.

''हर्ष,'' तो पुन्हा एकदा म्हणाला.

''तू शिंका देणं थांबव आणि मला तुझं नाव सांग,'' थोड्याशा रागानेच प्रिया म्हणाली.

''माझं नाव हर्ष आहे,'' तो थोडेसे त्रासून म्हणाला. ''ह, अर्धा र, आणि पोटफोड्या ष. हर्ष. पण तू मला हरी म्हणालीस तरी चालेल.''

''माझं नाव प्रिया. मी शेजारच्या घरात राहते. आम्ही गेल्या आठवड्यात इथं राहायला आलो.''

''मला माहितीय,'' हरी म्हणाला. ''ट्रकमधून तुमचं सामान काढत असतांना मी पाहिलं. तुझ्याकडं सायकल आहे?''

''नाही. पण आम्ही ती घेणार आहोत.''

''माझ्याकडं सायकल आहे,'' हरी म्हणाला. ''पण तिचं पुढचं चाक मी काढून ठेवलंय.''

''का?''

''मी ते जोडल्यावर सायकल पूर्वीपेक्षा अधिकच चांगली चालेल म्हणून.''

''मला तुझी सायकल दाखवतोस?''

तेव्हा सायकल दाखवायला म्हणून हरी प्रियाला घेऊन आपल्या घरात गेला. तो ''ही आमची कोठीची खोली,'' असे म्हणाला त्या खोलीत ती सायकल एका भिंतीला टेकून उभी होती. खोलीत अनेक इकडच्या तिकडच्या वस्तू होत्या. टायर आणि रबराच्या नळीचे तुकडे, हत्यारे, अर्धवट वापरलेले रंगांचे डबे, दोर, वंगणाचा डबा, खिळ्यांनी आणि नटबोल्टांनी भरलेले डबडे, खोरे, टेबलावरचा मोडलेला पंखा, आणि उलगडून ठेवलेला ट्रँझिस्टर रेडिओ.

''हे सगळं काय आहे?'' प्रिया म्हणाली.

''हे सगळं ना? अशाच आपल्या वापरायच्या वस्तू,'' हरी उडत उडत म्हणाला.

''या कोण वापरतं?''

''तसे आम्ही सगळेच,'' हरी पुन्हा उडत उडत म्हणाला. ''पण अर्थातच यातल्या बऱ्याच वस्तूंची नीट जुळणी करायला हवीय. चल, आता आपण माझ्या खोलीत जाऊया.''

तिकडे जाताना त्यांना लांबसडक बोळ लागला. त्यात पुस्तकांनी भरलेली बिनदाराची कपाटे एकमेकावर रचून ठेवली होती.

''बाई, बाई,'' प्रिया आश्चर्याने म्हणाली. ''किती ही पुस्तकं!''

''एखादं पुस्तक टाकून द्यायचं म्हणजे माझ्या आईच्या अगदी जीवावर येतं,'' हरी म्हणाला. ''खरं म्हणजे यातली काही माझ्या आजोबांच्या काळातलीसुद्धा आहेत.''

''इतक्या उंचीवरची पुस्तकं तुम्ही कशी काढता?'' मान वर करत वरती पाहत प्रियाने विचारले.

''मी तर या कपाटांच्या कप्प्यांचाच शिडीसारखा उपयोग करतो,'' हरी म्हणाला. आणि प्रात्यक्षिक म्हणून तो एखाद्या माकडासारखा पटापट एका कपाटावर चढला आणि सर्वात वर आरामात बसला. ''पण माझ्या आईला वरचं पुस्तक हवं असतं तेव्हा ती शिडी आणून वर चढते.''

टाचा वर करत प्रियाने हात उंचावला आणि तिथल्या कपाटाच्या एका बाजूचे पुस्तक ओढून काढले. त्याबरोबर थोडी धूळही उडाली.

''हर्ष,'' प्रियाला शिंक आली. धुळीच्या जवळपास आले की तिला नेहमीच शिंका येत. ''हर्ष.''

''मी तुला मला हरी म्हणायला सांगितलं होतं,'' कपाटावरून खाली उतरता उतरता हरी म्हणाला आणि नंतर आपल्या खोलीकडे पळाला.

पण त्याचे बोलणे प्रियाला ऐकू गेले नाही. कारण पहिली शिंक दिल्यानंतर तिला एक विलक्षण गोष्ट आढळली होती. तिने ओढून काढलेले ते पुस्तक एक छायाचित्रांचा संग्रह होता. तो आपोआप उघडला गेला. त्या उघडलेल्या पानावर तीक्ष्ण नजर असलेल्या एका बाईचे छायाचित्र होते. तिचे काळेभोर केस मागे वळवून पाठीमागे बहुधा बुचड्यात बांधले होते.

प्रियाने तिच्याकडे पाहिले तर ती बाई एकदम पण अगदी स्पष्टपणे म्हणाली, ''शिंकांनी स्वागत केलेलं मला आवडत नाही.''

''माफ करा,'' प्रिया म्हणाली, ''पण मी तुम्हाला पाहून शिंकले नाही. तर या धुळीमुळं शिंकले.''

''तुझं बोलणं मला ऐकू येत नाहीये,'' आपल्या खोलीतून हरी ओरडला. त्याला वाटले प्रिया त्याच्याशीच बोलते आहे. ''इकडं ये.''

तो संग्रह हातात घट्ट धरत प्रिया हरीच्या खोलीकडे धावली. ती अतिशय उत्तेजित झाली होती. ''हे पाहिलंस का?'' ती आश्चर्याने म्हणाली.

हरीने त्या पुस्तकाकडे पाहिले आणि सहजपणे म्हटले, ''हा होय? हा माझ्या वडलांचा जुन्या फोटोंचा संग्रह आहे. या जुन्या फोटोसारखे दुसरेही अनेक जुने फोटो त्यात आहेत. या फोटोतल्या बाईचा चेहरा किती उभट आहे हे पाहिलंस का?''

''याला शिष्टाचार म्हणत नाहीत,'' ती बाई संतापून उद्‌गारली.


आश्चर्याने डोळे विस्फारून हरी तिच्याकडे नुसता पाहतच राहिला. ''ही बोलली!'' तो उद्‌गारला.

''होय,'' प्रिया म्हणाली, ''ती माझ्याशीही बोलली!''

त्राग्याने हुंकार देत त्या बाईने आपले नाक उडवले. एखाद्या छायाचित्रातल्या बाईने असे करावे हे अद्‌भुत होते.

''ही कोण आहे?'' प्रिया कुजबुजली.

''माझी पणजी का अशीच कोणीतरी,'' हरीही कुजबुजला.



# छायाचित्र-संग्रह सापडला

"अशीच कोणीतरी म्हणजे?" ती बाई फटदिशी उद्गारली. "मी तुझी पणजीच आहे."

हरीने आवंढा गिळला. त्याला अस्वस्थ वाटत होते. तो प्रियाला म्हणाला, "या सगळ्याला तूच कारणीभूत आहेस. अशा भुताटकीच्या गोष्टी पूर्वी इथं कधीच घडल्या नव्हत्या."

"हा तुमचाच फोटोसंग्रह आहे," प्रिया लागलीच म्हणाली. जे काही घडले आहे त्याला आपण जबाबदार नाही अशी तिची खात्री होती. "मला यातलं काहीच माहिती नाही."

"किती खुळी ही मुलं!" पणजी म्हणाली, "कशावरूनही भांडतायत. त्यांना माहिती नाही की मीच हे सगळं केलंय."

"तूच केलंयस?" हरी म्हणाला.

"कसं केलं?" प्रियाने विचारले.

पणजीच्या चेहऱ्यावर समाधानाचे हसू पसरले. "माझ्या वाढदिवसाच्या दिवशी मला हा सगळा संग्रह जिवंत करता येतो."

"खरं म्हणताय?" प्रिया म्हणाली. "तुमचा आज वाढदिवस? किती छान. तुम्ही आता किती वर्षांच्या झालात?"

"एकशे पाच," गप्पांच्या ओघात बोलावे तसे पणजी बोलली, "किंवा एखादं वर्ष इकडं तिकडं. मला तितकी खात्री नाही."

"इतकी मोठी!" हरीला आश्चर्य वाटले. "मग तुझे केस पांढरे कसे झालेले नाहीत?"

"वेडा की काय तू? मी फक्त बावीस वर्षांची होते तेव्हाचा हा फोटो आहे."

"मग फोटो काढताना तुम्ही हसल्या कशा नाहीत?" प्रियाने विचारले.

"असे स्वतःचे सगळे दात दाखवायला मी तेव्हा एखादी खुळचट छोटी मुलगी होते की काय? मला तेव्हा खूप गंमत वाटत होती. तरीही कॅमेऱ्यासमोर मी आपला चेहरा अगदी सरळच ठेवला होता. फोटो काढणारा सारखा कॅमेऱ्यावरच्या काळ्या कापडात डोकं खुपसून लागलीच पुन्हा बाहेर काढायचा. ते पाहून तर मला खुदकन हसावं असंच वाटत होतं. पण तुझे पणजोबा तिथं हजर होते आणि मी तसं काही करते तर त्यांनी मला चांगलंच खडसावलं असतं. तेव्हा मी आपली हे सगळं केव्हा एकदा आटपतंय याची वाट पाहत एखाद्या सभ्य स्त्रीसारखी स्तब्ध आणि सरळ बसून राहिले होते."

"म्हणजे तुम्हाला म्हणायचंय की तेव्हा तुमचं लग्न झालेलंही होतं?" प्रिया म्हणाली.


"म्हणजे काय?" आश्चर्य वाटून पणजी म्हणाली. "वयाच्या अवघ्या पाचव्या वर्षीच मी नवरी झाले होते." मग बारीक डोळे करून प्रियाला न्याहाळत पणजी तिला म्हणाली, "तू किती वर्षांची झालीयस?"

"जवळ जवळ अकरा," प्रिया खुशीने म्हणाली.

"अकरा! आणि तरीही तू अजून बिनलग्नाची!" तिची दया येऊन पणजी उद्गारली. मग हरीकडे वळत ती म्हणाली, "एव्हाना तुझ्या बहिणीचं लग्न व्हायला हवं होतं."

"ईऽऽ," प्रिया म्हणाली.

"ती माझी बहीण नाहीये," हरी म्हणाला. "आणि पणजी, हल्लीच्या काळी इतक्या लवकर कोणी लग्न करत नाही. लग्नाच्या वेळी मुलीचं वय अठरा वर्षांखाली असता कामा नये असा सध्या कायदाच आहे."



''खरं?'' पणजी म्हणाली, ''काळ किती बदललाय पहा.''

''पणजी, आम्हाला तुझ्या आयुष्याविषयी काही सांगतेस?'' हरी उत्सुकतेने म्हणाला.

''एवढ्या मोठ्या कुटुंबाची काळजी वाहावी लागल्यामुळं मी अगदी भरगच्च आयुष्य जगले. आणि...'' पणजी सांगू लागली.

पण तिला अडवत प्रिया म्हणाली, ''मोठं म्हणजे किती लोकांचं?''

''किती लोकांचं? वीस तर होतेच आणि शिवाय–''

''तुला अठरा मुलं झाली होती?'' मोठा धक्का बसल्याप्रमाणे हरी म्हणाला.

''अठरा? तुला कुणी सांगितलं? मला फक्त सहाच मुलं झाली.''

''पण तुम्हीच म्हणालात ना आमच्या कुटुंबात वीस जण होते म्हणून,'' प्रियाने आठवण करून दिली.

''वीस जण तर कमीत कमी होतेच,'' बोटे मोडत पणजी म्हणाली. ''म्हणजे असं बघ. आम्ही दोघं आणि आमची सहा. मग माझे दीर. त्यांची बायको आणि तिची सात मुलं. मग वयस्क माणसं

आणि काही चुलत किंवा मामे नात्यातली. शिवाय अशीच राहायला आलेली अजून काहीजणं. अशी अगदी गर्दीच गर्दी असायची.''

''म्हणजे किती गंमत, नाही?'' प्रिया उद्‌गारली.

''ठेवलीय गंमत,'' पणजी फुत्कारली. ''कामाचा नुसता रगाडा असायचा. अगदी सतत. आणि त्यात भर म्हणून चाललेली इतक्या लोकांची आपापसातली धुसफूस.''

''पण मी खात्रीनं सांगते की तुम्ही कधी बोअर झाल्या नसणार,'' प्रिया म्हणाली.

''बोअर? म्हणजे काय?'' पणजी गोंधळून म्हणाली.

''अहो, म्हणजे काहीही आवडीचं करायला नसल्यामुळं आलेला कंटाळा.''

''आवडी बिवडीचं मला माहिती नाही,'' पणजी म्हणाली, ''पण माझ्यापुढं नेहमी कामाचे डोंगरच्या डोंगर असायचे.''

''पण तू कधी लांबच्या प्रवासाला वगैरे जायची नाहीस?'' हरी म्हणाला.

''जायचे तर!'' पणजी लागलीच म्हणाली. पण ते सगळं तुझे पणजोबा रेव्हेन्यू खात्यात अधिकारी होते म्हणून. मी सर्व प्रांतभर हिंडले. अगदी अनंतपूरपासून ते कन्याकुमारीपर्यंत.

''म्हणजे तुला जुना मद्रास प्रांत म्हणायचाय?''

''होय.''

आपण खूप दूरवरपर्यंत प्रवास केला आहे अशी पणजीची कल्पना दिसली. सध्याच्या काळात लांबचा प्रवास म्हणजे किती लांबचा याचे प्रमाणच बदलले असल्यामुळे त्या दोन्ही मुलांना साहजिकच पणजीने फारच थोडा प्रवास केला आहे असे वाटले.

''तुझ्या आयुष्यातली सर्वात जास्त उत्सुकता ताणणारी गोष्ट कोणती घडली ते सांगतेस?'' हरी म्हणाला.

''घरफोड्या घरात घुसला ती रात्र,'' पणजी म्हणाली. तिचे डोळे चकाकू लागले. ''पहाटेचे काहीतरी दोन किंवा तीन वाजले असतील. माझ्या आठवणीप्रमाणं तो डिसेंबर महिना होता. किंवा एखादेवेळी जानेवारीसुद्धा असेल. कारण तेव्हा थंडी वाजत होती. मुलांची पांघरूणं नीट आहेत की नाही हे पाहायला मी उठले. त्यावेळी मला तो आवाज अस्पष्टपणं ऐकू आला. तो घराच्या पाठीमागून येत असावा असं वाटल्यामुळे कसला आवाज येतोय ते पाहायला मी तिकडं गेले. एखादेवेळी नारळाच्या झावळ्या घराच्या छपरावर आदळत असाव्यात आणि त्याचा आवाज येत असावा असा माझा अंदाज होता.''

''अग पणजी, आम्हाला पटकन सगळंकाही सांग ना,'' हरी म्हणाला.

''एवढा धीर धरवत नाही?'' पणजी उद्‌गारली, ''तर आमचं सैंपाकघर घराच्या पाठीमागच्या भागात होतं. आणि त्याला जोडूनच एक बोळ होता. त्याच्या टोकाशी दार होतं आणि ते उघडलं की परसात जाता यायचं. त्या दाराशी मी गेले आणि कानोसा घेऊ लागले. तेव्हा तिथं सततपणं होणारा ठोकण्याचा आवाज मला ऐकू आला. आणि माझ्या लक्षात आलं की कोणीतरी घरात घुसण्यासाठी भिंतीला भोक पाडायच्या प्रयत्नात आहे.''

''मग तू काय केलंस?'' हरी म्हणाला.

''मी हळूच परत आले आणि तुझ्या पणजोबांना आणि दोघा तरूणांना उठवलं. आम्ही हातात बांबूच्या काठ्या घेतल्या आणि बोळात आलो. आम्ही तिथं अगदी वेळेवर पोचलो बघ. कारण आम्ही तिथं पोचतो न पोचतो तोच तिथल्या भिंतीचा ढपला खाली पडला. आणि पडलेल्या भगदाडातून कोणीतरी आत घुसायचा प्रयत्न करतंय असं आम्हाला दिसलं.''

"आई ग!" श्वास रोखत प्रिया उद्‌गारली, "मग पुढं काय झालं?"

"आम्ही सगळ्यांनी त्याच्यावर हल्ला केला. पण तो इतक्या गोंधळात केला आणि आमच्या काठ्या आमच्याच काठ्यांत इतक्या गुंतल्या की त्या चोराला हवा तितका चोप बसलाच नाही. आणि तो नक्कीच फार चपळ असणार. कारण आम्हाला लगेच कोणाच्या तरी पळत जाणाऱ्या पावलांचा आवाज ऐकू आला. आणि आम्ही दार उघडून बाहेर पाहिलं तर तिथं कोणीसुद्धा नव्हतं.





तो तेव्हा तसा पळाला म्हणून, नाहीतर मी सांगते, त्याला असं बदडून काढलं असतं की यंव.''

''पण तू त्याला चोरी करण्यापासून तर थांबवलंस,'' हरी म्हणाला.

पणजीचा चेहरा थोडा पडला. ''पूर्णपणं नाही,'' ती कुरकुरली, ''म्हणजे असं बघा, आमचे संडास आणि न्हाणीघरं सगळी परसात होती. आणि तो नालायक आमच्या तिथल्या सगळ्या तपेल्या घेऊन गेला.''

प्रियाला हसू आले. ''तेवढंच त्याच्या नशिबात होतं तर,'' ती म्हणाली.

''होय,'' सुस्कारा सोडत पणजी म्हणाली, ''पण त्यामुळं दुसऱ्या दिवशी सकाळी आमची किती पंचाईत झाली म्हणून सांगू. आंघोळीला किंवा परसाकडं जायला बरोबर पाण्याची तपेलीच नाही. अगदी भयानक अवस्था. त्या दिवशी आम्ही एक नवा धडा शिकलो. सुखी आणि समाधानी आयुष्य जगण्याकरता पाण्याच्या तपेल्यांचीही अतिशय आवश्यकता असते म्हणून.''

# टिप्पू आणि त्याचे टोळके

"मला वाटतं," हरी म्हणाला, "तो चोर काही अधिक महत्वाचं घेऊन चालला असताना तुम्ही त्याला रंगेहात पकडलं असतं तर अधिक मजा आली असती."

"काहीतरी काय?" पणजीने म्हटले.

"नाही म्हणजे," प्रिया म्हणाली, "अधिक गंमत वाटली असती."

"तशी आम्ही खूप गंमत करायचो," पणजी म्हणाली, "मुलं होती ना. त्यांच्यामुळं."

"पण कुठं आहेत मुलं?" हरी म्हणाला, "मला तर एकही दिसलं नाही."

"पुढच्या पानावर," पणजी चटकन म्हणाली.

त्यांनी उत्सुकतेने पुढचे पान उघडले. तेथे नुकताच फार मोठा विनोद घडला असल्याप्रमाणे खिदळणाऱ्या डोक्यावरचे केस पार विस्कटून गेलेल्या, चार मुलांचे घरगुती छायाचित्र होते. ती मुले पाच वर्षांपासून तेरा वर्षांपर्यंतची वाटत होती.

"हे कोण आहेत?" प्रियाने कुतुहलाने म्हटले.

चारातल्या सगळ्यात मोठ्या मुलाकडे बोट करत हरी म्हणाला," मला वाटतं हे माझे आजोबा असावेत. पणजोबांचा मुलगा."

"आणि बाकीचे?"

"ते त्यांचे भाऊ. अप्पू, कुप्पू, आणि थंबू."


"काय तरी नावं बाई!" तोंड वाकडे करत प्रिया म्हणाली. "आणि तुझे आजोबा. त्यांचंही नाव असंच काही होतं?"

"ही त्यांची लाडातली नावं आहेत," हरी म्हणाला. "आजोबांचंही असंच मजेशीर नाव होतं. त्यांना टिप्पू म्हणत."

"का?"

"मला माहिती नाही."

"म्हणजे टिप्पू सुलतानासारखं?"





"तसंही असेल कदाचित."


"हे सगळे खोडकर दिसतायत, नाही का?"

आणि अकस्मातपणे छायाचित्रातल्या त्या मुलांशेजारी आपण उभे आहोत असे हरी आणि प्रियाच्या लक्षात आले. ते चौघे कुठलातरी खेळ खेळण्यात गुंग होते.

हरी आणि प्रिया एका प्रशस्त दिवाणखान्यात उभी होती. कुतुहलाने आजूबाजूला पाहत प्रियाने विचारले, "आपण कुठं आहोत?"

"हे माझ्या आजोबांचं गावातलं घर आहे," हरी म्हणाला. दिवाणखान्याच्या मध्यभागी, ती दोघे उभी होती त्याच्या शेजारीच, छप्पर नसलेली मोकळी जागा होती. त्यावर एक झरोका होता. त्यातून येणारी हवा आणि सूर्यप्रकाश यांच्यामुळे ती खोली हवेशीर आणि छानपैकी प्रकाशमय झाली होती. दिवाणखान्याच्या चारी टोकांना दुसऱ्याही खोल्या असाव्यात असे वाटत होते.

त्यांच्या उजव्या हाताला छोटीशी वाट होती, आणि घराच्या पुढच्या दरवाज्याकडे जात होती.



उलट बाजूला तशीच दुसरी वाट होती आणि तिच्या शेवटी दरवाजा होता. त्या उघड्या दरवाजातून थोड्याच अंतरावर अजून एक कडी लावलेला दरवाजा दिसत होता.

''अग बाई, किती हे दरवाजे,'' प्रिया उद्गारली.

''शऽऽ,'' हरीने केले.

''का म्हणून?'' प्रिया म्हणाली.

''त्यांना आपलं बोलणं ऐकू जाईल,'' हरी कुजबुजला, ''आणि आपण इथं कसे असा त्यांना प्रश्न पडेल.''

''तुझ्या एक गोष्ट लक्षात आलीच नाही का?'' आवाज हळू न करता प्रिया म्हणाली, ''मला वाटतं त्यांना आपला आवाज ऐकू येत नाही. एवढंच नाही तर आपण दिसतही नाही. आपण इथं आहोत याची त्यांना कल्पनासुद्धा नाही.''

हा खरोखरच भुताटकीचा प्रकार वाटत होता. ''जणू आपणच भुतं आहोत,'' हरी पुटपुटला.

टिप्पू आजोबा बसले होते तिकडे हरी गेला आणि त्यांच्या पाठीमागे त्यांना खेटून उभा राहिला. लागलीच आजोबा ओरडले—''माझ्या मानेवर कोणाचा श्वास येतोय?'' त्यांनी पटदिशी मागे वळून पाहिले. पण अर्थातच त्यांना काही दिसले नाही. अगदी हरीच्या डोळ्याला डोळा लावून पाहत असतानाही. हरी एक पाऊल मागे सरकला.

''हे कोणता खेळ खेळतायत ते पाहिलंस का?'' प्रिया म्हणाली. ''आपल्या ल्यूडोसारखाच दिसतोय.'' तो एक जाड पुठठयाचा मोठा चौकोनी तुकडा होता. त्याच्यावर पंचवीस चौरस काढले होते. प्रत्येक बाजूच्या मध्यभागी आणि आकृतीच्या मध्यभागी असलेल्या चौरसांवर एकेक फुली मारलेली होती. ती मुले नाण्याऐवजी बटणे वापरतं होती. त्यांचे फासे म्हणजे चार कवड्या होत्या. उघड्या बाजूला उडणारी प्रत्येक कवडी म्हणजे एक गुण आणि चारीही उपड्या पडल्या तर आठ गुण अशा प्रकारे ते खेळत होते. आपल्या बाजूच्या चौरसावरून सुरुवात करून चक्राकार फिरून मध्यभागी असलेल्या चौरसावर पोचण्याचा त्यांचा प्रयत्न होता. ल्यूडोप्रमाणेच दुसऱ्याच्या मालकीच्या जागेवर पडून त्याला पुन्हा सुरुवात करायला लावायच्या प्रयत्नात प्रत्येकजण होता.

''आजोबा जिंकतायत,'' हरी म्हणाला.

तेवढ्यात टिप्पू आपल्या जागेत घुसणार हे पाहताच कुप्पू ओरडला, ''तू खोटं खेळतोयस. तुला तीनच पडले होते; चार नाही. मी पाहिलंय.''

''नाही. मला चारच पडले होते,'' टिप्पू दणक्यात म्हणाला, ''नाही का रे थंबू?''

''होय,'' थंबू म्हणाला.

''नाही,'' अप्पू ओरडला, ''टिप्पू खोटं खेळतोय.''

आणि मारामारी सुरू झाली. काही वेळ सगळ्यांचेच हात आणि पाय वेगाने काम करत होते. तेवढ्यात कुप्पूचा एक गुद्दा जोरात लागल्याने थंबू एकदम मोठ्याने रडू लागला.

ताबडतोब दिवाणखान्याच्या दोन्ही बाजूंच्या खोल्यांतून आणि आतल्या बोळकांडीतून दहा एक तरी माणसे डोकावू लागली.

''इतके लोक्!'' प्रिया आश्चर्याने म्हणाली, ''इतका वेळ हे सगळे कुठं होते?''

मारामारीत गुंतलेल्या त्या चारी मुलांकडे येत एक वयस्क बाई तक्रारीच्या सुरात म्हणाली,'' ही मुलं नेहमीच मारामाऱ्या करतात बाई!''

ती तशी येतांना दिसताच टिप्पूने स्वतःची सुटका करून घेतली आणि दिवाणखान्याच्या बाहेर थेट पुढच्या दरवाजातून त्याने सूंबाल्या केला. उरलेले तिघे तितक्याच वेगाने त्याच्या पाठोपाठ पळाले. आता ती मुले काय करतात ते पाहायला हरी आणि प्रियाही त्यांच्या पाठोपाठ पळाली.

''हे सगळे किती चपळ आहेत, नाही?'' दम खात हरी उद्गारला.

# चविष्ट डुबी

रस्त्यापासून पन्नास एक यार्डांवर ते चौघे थांबले. एका झाडाच्या बुंध्यापाशी उभे राहून ते त्याच्या लांब फांदीच्या टोकाला अडकलेल्या पतंगाकडे पाहत होते. ती फांदी बऱ्याच उंचावर होती. तितके उंच चढणे अवघड होते. ते झाड एका घरावर वाकलेले होते आणि चढणाऱ्याला त्याच्या भिंतीचा



आधार घेता आला असता हे खरे असले तरीही वर चढणे अवघडच होते.

ते सगळे न्याहाळून टिप्पूने म्हटले, "नाही, ते जमणार नाही."

"न जमायला काय झालं?" अप्पू म्हणाला.

"नाही जमणार," टिप्पू ठासून म्हणाला.

"जमेलच," अप्पू आत्मविश्वासपूर्वक म्हणाला.

"मग दाखव करून," टिप्पू म्हणाला.

आव्हान मिळाल्यावर पाठ दाखवणारा अप्पू नव्हता. तो झाडावर चढू लागला. झाडावर चढण्यात तो तरबेज होता. निबर फांद्या-खोडात पाय कसा रूतवायचा, त्याचप्रमाणे जरुरीनुसार शेजारच्या घराच्या भिंतीवर कसा भार द्यायचा हे त्याला चांगले कळत होते. झाडाच्या मुख्य खोडाशी दोन फांद्यांनी केलेल्या दुबेळक्यापर्यंत तो चढला आणि दम खायला थांबला.

"हेच तू करून दाखवणार होतास ना?" त्याला डिवचत टिप्पूने विचारले.

"अप्पू, उतर खाली; उतर खाली," टिप्पूची बाजू घेत थंबू ओरडू लागला.

"तो फक्त दम खायला थांबलाय," अप्पूची बाजू घेत कुप्पू ओरडला, "तुम्हाला दिसत नाही का?"

अप्पू त्या दुबेळक्यातून बाहेर पडला. आता चढण्यातला अवघड भाग सुरू झाला होता. अजून तीन फूट वर चढल्यावर हवी ती फांदी लागणार होती. तिच्या टोकापासून तो पतंग लोंबकळत होता. तो हस्तगत करायचा तर पकड न सोडता त्या आडव्या फांदीवरून निदान आठ फूटतरी जावे लागणार होते. खाली असणारे सगळेजण श्वास रोखून वर पाहत होते.

आपला पाय रोवण्यासाठी जागा सापडायला अप्पूला थोडा वेळ लागला. त्याला एक जागा मिळाली, पण तिचा उपयोग केला तर तो त्यावरच्या फांदीच्या चुकीच्या कोनात येत होता. तेव्हा थोडेसे घसरून तो त्या दुबेळक्याच्या दुसऱ्या बाजूला आला आणि तेथे एका जागी त्याने आपला पाय रोवला. अजून थोडीशी तशीच धडपड करून तो अखेरीला त्या फांदीपाशी आला. आणि मग हळूहळू तो तिच्यावरून आडवा जाऊ लागला.

"झाडावर चढण्यात तो किती पटाईत आहे, नाही?" हरी कौतुकाने म्हणाला.

आता अप्पू त्या पतंगापासून हातभर अंतरावर आला होता. विजयी हास्य करत त्याने खाली टिप्पूकडे पाहिले. मग हात लांबवून त्या पतंगाला झाडापासून सोडवण्याचा प्रयत्न केला. पण पतंगाचा धागा तेथल्या पानांपानांत गुंतला असल्याने अप्पूला ते जमेना. मग अजून एक प्रयत्न म्हणून त्याने तो धागा एकदम जोराने खेचला. त्यामुळे पतंग सुटला पण त्याच वेळी अप्पूचाही तोल गेला आणि किंकाळी फोडत खाली पडून तो दिसेनासा झाला.

"अप्पूऽऽ!" कुप्पू ओरडला.

"चला, जाऊया," टिप्पू म्हणाला आणि लागलीच वेगाने धावू लागला. तो शेजारच्या घराशी गेला. त्या घराची रचना त्याच्या स्वतःच्या घरासारखीच होती. ते फक्त आकाराने लहान होते, एवढेच. उघड्या दरवाजातून टिप्पू आत शिरला आणि त्याच्या पाठोपाठ इतर मुले. त्या घरातल्या कोणालाही याचे काही वाटल्याचे दिसले नाही. जणू त्या सगळ्यांना अशा धावणाऱ्या मुलांची सवयच होती.

टिप्पू आणि इतर सगळे आतल्या अंगणात आले. त्यांच्या डाव्या हाताला गवताने शाकारलेला गोठा होता. त्याच्या छपराला आता एक मोठे, वेडेवाकडे भोक पडले होते. त्यावरून अप्पू कोठे पडला याचा अंदाज करता येत होता. गोठ्यात पिंगट द्रवाने भरलेली गुरांच्या चारापाण्याची मोठी डोणी होती.



मुले शोधक नजरेने इकडे तिकडे पाहत होती. तेवढ्यात त्यांना त्या भरलेल्या डोणीमध्ये जोराने खळबळ होताना दिसली. आणि पुढच्याच क्षणी त्यातून ती मूर्ती उभी राहिली. द्रवाने पूर्णपणे माखलेला आणि हातात फाटका पतंग धरून विजयी हास्य करणारा अप्पू आता तेथे उभा होता.

''मिळवलाय की नाही?'' अप्पूने रूबाबात म्हटले.

''काय उपयोग?'' टिप्पू तुच्छतेने म्हणाला. ''आपल्याला तो काही उडवता येणार नाही.''

''तुझा काय अवतार झालाय ते तर आधी बघ,'' कुप्पू म्हणाला.

खरोखरच अप्पूचा अगदी अवतार झाला होता.

पण अप्पूला त्याचे काही वाटत नव्हते. उलट त्याला ही सगळी गंमतच वाटत होती. ज्या द्रवात तो बुडाला होता त्याच्याकडे हात करत तो म्हणाला, ''हे चविष्ट आहे.''

''आता खोटं नको बोलू,'' कुप्पू रागाने म्हणाला.



"खरंच," अप्पू खाली येत म्हणाला, "यात ताक आहे. कालचे उरलेले बरेच चविष्ट पदार्थ आहेत. शेंगदाण्याची आणि तिळाची वडी आहे. त्यामुळं इतकं चविष्ट झालंय की विचारूच नका. एकदा चव तर घेऊन पहा."

कुप्पू आणि थंबू यांच्या तोंडाला पाणी सुटले होते. पण अप्पू आपल्याला फसवत तर नाही ना अशी त्यांना भीतीही वाटत होती. यावर टिप्पू काय म्हणतोय ते ऐकायला त्याच्याकडे पाहत थंबू म्हणाला, "जणू काही गायी म्हशींना पाजायची पेज चविष्ट असते!"

आणि यावर एकदम एखाद्या न्यायाधीशाच्याच रूबाबात टिप्पूने निकाल दिला," ते चविष्ट असतं."

"तुला म्हणायचंय तू त्याची चव पाहिलेली आहेस?" विश्वास बसत नसल्याप्रमाणे थंबू म्हणाला.

"होय."

"आणि ते खरोखरच चविष्ट असतं?"

"होय."

आता टिप्पूनेच प्रशस्ती केल्यामुळे कुप्पू आणि थंबू यांना त्या भांड्यातल्या पदार्थापासून लांब राहवेना. त्यांनी हाताच्या ओंजळी केल्या, त्या त्या पातळ पदार्थात बुडवल्या, आणि चव घेऊन पाहिली. ते खरेच फार चविष्ट लागत होते. त्यांनी मग मागेपुढे न पाहता अजून काही ओंजळी फस्त केल्या. अप्पूनेसुद्धा तसेच केले.

"तुझं बरोबर आहे," टिप्पूकडे पाहत थंबू म्हणाला, "चल, तूही आमच्यात सहभागी हो."

"नाही."

"का नाही?" अप्पू म्हणाला, "ते चविष्ट असतं असं तूच म्हणालास ना?"

"चल, तूही ये," कुप्पू म्हणाला.

"नाही."

सगळ्यांनी त्या पेयाच्या डोणीकडे दुर्लक्ष करत टिप्पूकडे तोंडे फिरवली.

"का नाही?" अप्पूने विचारले. त्याला आता मोठी शंका आली होती.

"ते चविष्ट असतं हे तर खरंच," टिप्पू उडत उडत म्हणाला, "पण ते फार सारक असतं. परसाकडे जाण्यासाठी तुम्हाला उद्या चड्ड्या सावरायलासुद्धा फुरसत मिळणार नाही."

आणि त्या तिघांनी आपल्यावर हल्ला करायच्या आत तो चटकन आपल्या घराच्या दिशेने पळत सुटला.

हरी आणि प्रियाला त्यांच्या पाठोपाठ जायला आवडले असते. पण त्यांच्या लक्षात आले की दुर्दैवाने आपण आता त्या चित्रातच नाही. ती दोघे पुन्हा एकदा हरीच्या खोलीत त्या छायाचित्र-संग्रहासमोर उभी होती.

# चार उंदीर

त्यांनी छायाचित्र-संग्रहाचे पुढचे पान उलटले. तेथे त्यांना एक पंधरा सोळा वर्षांची मुलगी आपल्याकडे पाहून हसताना दिसली. तिचे हास्य पाहून या दोघांनीही लागलीच प्रतिहास्य केले.

''तू नक्कीच माझी आजी असणार,'' हरी उद्गारला, ''पण तरुण आजी.''

त्याची आजी तो सहा वर्षांचा असतानाच वारली होती. आणि ती किती मायाळू आणि थोर मनाची होती एवढेच त्याला आठवत होते. साहजिकच आजीला पाहून त्याला मनापासून आनंद झाला.

''म्हणजे तू हरीच ना? तू एकदम गुंड मुलगा!'' ती लडिवाळपणे म्हणाली.

''तू या फोटोत छान दिसतेस,'' हरी उत्साहाने म्हणाला, ''आणि आजी, तुला माहितीय? आम्ही आताच आजोबा आणि त्यांचे भाऊ वेड्यावाकड्या गोष्टी करताना पाहिले.''

''म्हणजे कशाप्रकारच्या गोष्टी?''

''ते सगळे गोठ्यात गुरांच्या खाण्यापिण्याच्या डोणीशेजारी होते आणि आजोबांनी त्या तिघांना त्यातलं ते पेय पिऊ दिलं.''

''ते म्हणायचंय होय तुला? त्यांनी मला त्याबद्दल सांगितलं होतं. तसंच म्हणायचं तर अप्पूभाऊजी नेहमीच मला अशा विलक्षण गोष्टी सांगायचे आणि ते कळताच तुझ्या आजोबांचा रागाने भडका उडायचा,'' गमतीने हसत आजी म्हणाली.

''आणि तुमचंही लग्न तुम्ही पाच वर्षांच्या असतानाच झालं?'' प्रियाने विचारले. नाही म्हटले तरी हरीच्या पणजीचे तेव्हाच झाले होते.

''इतक्या लहानपणी?'' धक्का बसल्याप्रमाणे आजी उद्गारली, ''नाही बाई. कायद्यानंच त्याला आडकाठी होती. मी पंधरा वर्षांची झाल्यावर माझं लग्न झालं.''

''ते अगदी धुमधडाक्यात झालं का?'' प्रियाने विचारले.

''त्या धुमधडाक्याचं मला माहिती नाही हं—पण ते पाच दिवस चाललं. आणि काय घडलं तुम्हाला माहितीय! लग्नाच्या दिवशी—म्हणजे मुहूर्ताच्याच दिवशी सकाळी आजोबा मुळी घरी सापडलेच नाहीत!'' खुदुखुदु हसत आजी म्हणाली.

''ते पळून गेले होते?''


''तसं नाही रे वेड्या. त्याचं काय झालं, की जवळच्या वस्तीत आग लागल्याचं कुप्पूभाऊजींनी ऐकलं. त्यांनी ते आपल्या भावांना सांगितलं आणि त्या सगळ्यांनी मिळून ठरवलं की लग्न असो वा नसो, ती आग विझवायला गेलंच पाहिजे. म्हणून ते नाहीसेच झाले. आणि त्यामुळं उडालेल्या गोंधळाची कल्पना करता येईलच. त्यांना शोधण्यासाठी लोकांनी सगळ्या घराचा कोपरा न कोपरा शोधला पण त्यांचा पत्ताच नाही. मग अखेरीला दुपारी ते काळ्या मिचकूट रंगानं माखलेले चारी भाऊ घरी परत आले.'' मग आजीने हसत हसत आपले बोलणे पुरे केले. ''आणि मला आपलं वाटलं आपणही त्यांच्याबरोबर गेलो असतो तर किती बरं झालं असतं म्हणून!''

''तुमचं टोळकं किती गमतीशीर होतं नाही?'' हरी म्हणाला.

''माझी खात्री आहे तुम्ही दिवसभर नुसती मजाच मजा करत असाल,'' प्रिया म्हणाली.

''असा गैरसमज करून घेऊ नकोस,'' आजी म्हणाली, ''मला घरात कामं असायची. आजोबा कामासाठी घराबाहेर पडायचे. आणि इतर अभ्यासात मग्न व्हायचे.''

''अरेरे, ते सगळे इतके व्यग्र कसे झाले?'' हरी म्हणाला.



''अर्थातच खोड्या करायला आम्ही अधून मधून वेळ काढायचोच,'' डोळा मारत आजी उद्गारली.

''मग आम्हाला सांग ना,'' हरी उत्सुकतेने म्हणाला.

''म्हणजे असं पहा,'' आजी म्हणाली, ''हा फोटो काढला त्या सुमारातली एक रात्र माझ्या चांगल्या लक्षात आहे. ती मध्यरात्रीची वेळ होती आणि मला कडाक्याची भूक लागली. सकाळपर्यंत काही दम निघणार नाही याची मला खात्री वाटली. तेव्हा मी विचार केला की हळूच स्वैपाकघरात जाऊ या आणि तिथं ताकबिक सापडेल ते पिऊ या. मी उठले आणि चोरपावलांनी खोलीबाहेर पडले तो माझ्या खांद्याला कोणी तरी स्पर्श केला. अग बाई! काय मी घाबरले म्हणून सांगू!''

''कोण होतं ते?'' डोळे मोठे करत प्रियाने विचारले.

''अग, ते होते माझे थंबूभऊजी. इतक्या रात्री चोरपावलांनी फिरत मी काय करतेय हे त्यांना विचारायचं होतं. आणि काय ते कळल्यावर ते म्हणाले, की मलाही भूक लागलीय म्हणून! आणि एक दोन क्षणातच अप्पूभाऊजी आणि कुप्पूभाऊजीही आमच्या तिथं हजर आले. त्यांनाही भूक लागली होती.''

प्रियाला हसू आवरेना.

''तर असे आम्ही चौघं जमा झालो. आम्ही हळूच स्वैपाकघरात गेलो, दार लोटून घेतलं, आणि

दिवा लावला. मी ताक बाहेर काढलं आणि ते एका पेल्यात ओतणार तेवढ्यात अप्पूभाऊजी म्हणाले, काहीतरी खायला हवंय; नुसतं ताक नाही. भात शिल्लक असला तर तो हवाय.''

''आणि भात तर शिल्लकच नव्हता, नाही का?'' हरी म्हणाला.

''अरे वाटेल तेवढा होता.'' आजी म्हणाली, ''म्हणजे असं पहा, सकाळकरता म्हणून आम्ही तो नेहमीच शिल्लक ठेवत असू. त्यात ताक कालवून आम्ही तो न्याहरीला वापरत असू. तर त्या रात्री भातापर्यंत पोचायला आम्हाला काही क्षणांचाच अवधी लागला. नेहमीप्रमाणं तो एका मोठ्या भांड्यात ठेवला होता आणि उंदरांनी तेथे शिरू नये म्हणून त्याच्या तोंडावर एक मोठ्या दगडाचे



झाकण ठेवले होते. आवाज होऊ न देण्यासाठी कमालीची काळजी घेत मी मग भात, ताक आणि थोडंसं लोणचं बाहेर काढलं. आणि मग आमच्या त्या जेवणाची तुम्हाला काय हकीकत सांगू! खरंच सांगते तसलं चविष्ट जेवण मला आयुष्यात पुन्हा कधी मिळालं नाही!''

''तुमची चाहूल कोणालाही लागली नाही?''

''कोणालाही नाही. मग आम्ही हळूच हात धुतले, सगळं काही जागच्या जागी ठेवलं, दिवा विझवला, आणि अतीव समाधानानं आपापल्या अंथरूणाकडं गेलो.''

'आणि मग सकाळी त्यांना पत्ता लागला?''

''लागलीच नाही. ज्यातला भात आम्ही रात्री फस्त केला होता त्या भाताच्या भांड्याकडं तुझ्या पणजी वळल्या त्यावेळी मी स्वैपाकघरातच होते. आणि माझ्या छातीत भीतीनं धडकीच भरली. मी गुपचूप पण डोळ्यांच्या कडांतून त्यांच्याकडं पाहत होते. त्यांनी तो भांड्यावरचा मोठा दगड खाली उतरवला, भातासाठी भांड्यात हात घातला, आणि काहीतरी भयानक घडलेलं समजलं असल्याप्रमाणं त्यांचा चेहरा भीतीनं भरून गेला आणि त्यांनी किंकाळी फोडली.'' आजीला हसूच आवरेना. ''ते खरोखरच किती हास्यकारक होतं, नाही?'' ती म्हणाली आणि हसत सुटली.

''अग आजी, तू अशी हसत बसू नकोस,'' हरी अधीरतेने म्हणाला, ''पुढं काय घडलं ते आधी सांग.''

''तुझ्या पणजी ज्या तऱ्हेची आरडाओरड करत होत्या ती ऐकून घरातले सगळेच तिथं धावत आले. ते 'काय झालं? काय झालं?' असं विचारू लागले.'' आणि मग आजी पुन्हा खळखळून हसू लागली.

''अग आजी,'' हरी म्हणाला, ''अशानं तुझी हकीकत कधीच पुरी नाही व्हायची.''

''ठीक आहे. आता नाही मी हसणार. पण ते नक्कीच कमालीचं हसे येण्याजोगं होतं,'' आजी म्हणाली, ''मग तुझ्या पणजींनी त्यांना सांगितलं की उंदीर भांड्यात घुसला होता आणि त्यानं भाताचं शीत न् शीत फस्त करून टाकलंय म्हणून.''

''म्हणजे तुम्हाला म्हणायचंय की,'' प्रिया म्हणाली, ''ही एखादेवेळी खोडी असेल असं तिथल्या कोणालाच वाटलं नाही?''

''अग, काय सांगायचं तुला?'' आजी म्हणाली, ''आपलं हसू आवरता आवरता मला ठसका लागायची वेळ आली होती. आणि मग काही शंका आल्यासारखा आजोबांचा चेहरा दिसू लागला. त्यामुळं तर मला अधिकच हसू आलं. तेवढ्यात अप्पूभाऊजींनी जाहीर केलं की भात फस्त करणारे ते उंदीर आपण पाहिलेत आणि ते चार होते म्हणून! त्यामुळं तर मला मग थांबताच येईना. मी खाली बसले आणि मोठ्यानं हसू लागले. मला वेड तर नाही ना लागलं अशा शंकेनं घरातले सगळे वळून माझ्याकडं पाहू लागले.''

''आणि त्यामुळं तू बरोबर पकडली गेलीस, असंच ना?'' तिची कणव येत हरी म्हणाला.

''नाही, तसंही नाही; ते सगळं तेवढ्यावरच थांबलं नाही. आपण ते उंदीर पाहिलेत असं सांगून अप्पूभाऊजी पाठीमागे वळले आणि तेथून शांतपणं निघून गेले. आणि सगळेजण अप्पूभाऊजी काय म्हणाले त्याचा विचार करू लागले. तेवढ्यात आश्चर्यानं डोळे फिरवत म्हाताऱ्या आत्या उद्‌गारल्या : 'खरोखरच ते उंदीर फार हुषार असले पाहिजेत. त्यांनी एवढा जड दगड उचलून झाकण उघडलं आणि पुन्हा पूर्वीसारखं जसंच्या तसं ठेवलं हे सांगितलं तर कोणाचा विश्वास बसेल का?''

प्रिया एकदम हसली. ''झाकण पूर्वीप्रमाणं नीट बसवणारे उंदीर! कमालच की!'' ती हसत हसत म्हणाली. आणि पुन्हा एकदा हरीच्या आजीचा चेहरा ती खळखळून हसत बसणार असा दिसू लागला.

"नाही आजी, तू नाही म्हणजे नाही हसायचं," हरी म्हणाला.

आजीने स्वतःला सावरले आणि ती पुढे म्हणाली, "आणि आता कुप्पूभाऊजींची पाळी होती. ते अगदी गंभीरपणं म्हणाले की आपणही ते चार उंदीर पाहिलेत; त्यांची लक्षणं काही चांगली दिसत नव्हती म्हणून आपण त्यांना निरखून पाहिलं; आणि आपण शपथेवर सांगायला तयार आहोत की त्या चारात तीन श्री. एक सौ. उंदीर होत्या म्हणून."

"त्यामुळं सगळं भांडंच फुटलं ना?" प्रिया म्हणाली.

"होय," हसत हसत आजी उद्‌गारली, "पण असं पहा, त्यात आम्ही चारजण होतो. त्यामुळं फारशी काळजी करण्यासारखं काही नव्हतं. आणि तसं म्हणजे बसलेला पहिला धक्का ओसरल्यावर त्यांनासुद्धा त्यातला विनोदाचा भाग दिसला. त्यामुळं साध्या ताकिदीवरच सारं काही भागलं."

"कुप्पू आजोबा वेडेच होते," हरी म्हणाला, "श्री. व सौ. उंदीर! काय हे बोलणं! त्यांना स्वतःचं तोंड बंद ठेवता येत नव्हतं का?

"नाही, ते त्यांना जमलंच नसतं," आजी म्हणाली, "त्यांच्या स्वभावाला ते धरून नव्हतं. घरातल्या सगळ्यांत त्यांचंच तोंड बोलकं होतं. म्हणून तर ते पुढं इतके चांगले वकील झाले. काय सांगू तुम्हाला! ते अशा गोष्टी सांगायचे की त्यावर कोणाचा विश्वासच बसू नये."

"आम्हालाही त्या गोष्टी ऐकायला मिळाल्या तर किती बरं होईल!" प्रिया म्हणाली.

"मग तू स्वतःच का नाही त्यांना त्या सांगा म्हणत?" आजी म्हणाली. "पुढची काही पानं उलटल्यावर तुम्हाला ते दिसतील. सुटाबुटातला एक अगदी तरतरीत तरूण!"

# सांबूचे सोने

त्यांना कुप्पू आजोबा सहजगत्या सापडले. किंबहुना कुप्पू आजोबांनाच ते आधी सापडले. कारण त्यांच्या पानापाशी ती दोघे येतात न येतात तोच त्यांना कुप्पू आजोबाचा आवाज ऐकू आला, ''दोन कार्टी, आलं माझ्या लक्षात. काहीतरी खोडी करायला निघालीत. काय रे, तुम्ही कुठून आलात?''

हा शब्दांचा भडिमार इतका अनपेक्षित होता की ती दोघे दचकलीच. हरी कसेबसे म्हणाला, ''आम्ही कार्टी नाही आहोत. आणि मला नाही वाटत–''

''अर्थातच तुला वाटत नाही,'' त्याला तोडत कुप्पू आजोबा म्हणाले, ''तुम्हा दोघांना पाहिल्या पाहिल्याच ते माझ्या लक्षात आलं.''


प्रियाला हसू आले.

हरी रागावलेला दिसला.

''आणि आनंदाची गोष्ट म्हणजे मलासुद्धा तसं वाटत नाही,'' कुप्पू आजोबा पुढं म्हणाले. ''ज्यांना नको इतकं वाटून घ्यायची सवय असते तीच माणसं पुढं मार खातात. माझा मित्र सांबू याच्याप्रमाणं.''

प्रियाचे डोळे चमकले. ''सांबूचं काय झालं?'' ती म्हणाली.





"सांबूला अशीच नेहमी नको इतकं वाटून घ्यायची सवय आहे," आजोबा म्हणाले, "तसा तो त्याच्या त्याच्या परीनं एक प्रकारचा संशोधकच आहे. त्याचं म्हणणं असं की माणसाला जेवढं आवश्यक आहे तेवढं सगळं ज्ञान वैदिक काळात शोधलेलंच आहे. त्यामुळं जुन्या पुराण्या हस्तलिखितांचे तुकडे किंवा दगडांवर खोदून ठेवलेले शिलालेख यांचा तो नेहमी शोध घेत असतो. ते सगळे आश्चर्यकारक वस्तू निर्माण करण्याच्या सूत्रांनी पुरेपूर भरलेले आहेत असं त्याचं म्हणणं."

"बापरे!" हरी उद्गारला, "त्यांचा उपयोग करून त्यांनी एखादा मोठा शोध लावला का?"

"तो नेहमीच त्या बेतात असतो; पण बिचाऱ्याचं नशीबच खोटं आहे. शेवटच्या क्षणी नेहमी काहीतरी बिघडतं. त्याला मिळालेल्या कृत्रिमरीत्या सोनं निर्माण करण्याच्या सूत्राप्रमाणं."

"कमालच म्हणायची! "हरी म्हणाला, "सोनं कसं निर्माण करणार?"

"त्याची सुरुवात वाघाच्या मूत्रापासून करायची," आजोबा भडाभड सांगू लागले, "ते एक चतुर्थांश होईपर्यंत त्याची वाफ करायची आणि मग त्यात अगदी तितक्याच वजनाचा पारा मिसळायचा आणि—"

“वाघाचं मूत्र!” नाक मुरडत प्रिया उद्गारली, “ईऽऽ.”

“आणि तसंच म्हणायचं तर वाघाच्या मूत्राचा पुरवठा सातत्यानं कसा होणार?” हरी म्हणाला.

“ते सगळं सांबूनं विचारपूर्वक ठरवलं होतं. आणि ते तसं सहज शक्यही होतं. म्हणजे असं पहा, मद्रासच्या प्राणी संग्रहालयात वाघांची एक जोडी होती. तेव्हा सांबूनं तिथल्या रखवालदाराशी संधान बांधलं. आपल्याला हवं ते भरून ठेवण्यासाठी प्रत्येक आठवड्याला तो त्या माणसाला पैसे देत असे. प्रत्येक बाटलीला इतके इतके पैसे अशा पद्धतीनं.”

“आणि त्याचा उपयोग झाला?” हरीने अधीरतेने विचारले.

“आवश्यक त्या मालाचा पुरवठा नियमितपणं होत राहिला. आणि सांबूची प्रयोगशाळाही जोरात चालू होती. आलेल्या प्रत्येक बाटलीवर तो प्रयोग करत असे. हे असं काही महिने चालू होतं. पण सांबूचं दुर्दैव असं की त्याला कणभरसुद्धा सोनं निर्माण करता आलं नाही.”

“सूत्रच खोटं किंवा चुकीचं असणार,” आपल्याला त्यातले सगळे कळते अशा थाटात हरी म्हणाला.

“तसंच काही म्हणता येणार नाही,” आजोबा म्हणाले. “आपल्या जवळच्या कागदपत्रांची त्यानं किमान शंभरवेळा तरी वाचून पुन्हा पुन्हा छाननी केली. आणि तसंच म्हणायचं तर त्याचा हा प्रयोग का फसला याबाबतीत माझ्या जवळही एक माझं स्वतःचं असं स्पष्टीकरण आहे.”

“उपकरणंच हवी तितकी चांगली नव्हती का?” हरी म्हणाला.

“तसंही नाही,” आजोबा म्हणाले, “मला वाटतं प्राणीसंग्रहातल्या त्या रक्षकाला वाघाचं मूत्र मिळवणं अवघड गेलं असावं. नाही म्हटलं तरी वाघ हा हिंस्र प्राणी. त्याच्याशी अशा बाबतीत जमवून घेणं तसं अवघडच. त्यामुळं त्या रक्षकानं थोडीशी फसवाफसवी केली असावी, म्हणजे सांबूला वेगळ्याच नमुन्याचा पुरवठा केला असावा. म्हणजे वाघाच्या मूत्राऐवजी दुसऱ्याचं—म्हणजे आलं ना लक्षात?”

प्रियाला हसू आवरेना. हसणं संपल्यावर ती म्हणाली, “अहो आजोबा, काय हो तुमची ही वेडीवाकडी गोष्ट! तुमच्याजवळ साध्या गोष्टीच नाहीत का?”

“सरळसाधी गोष्ट सांगायचा मी माझ्याकडून प्रयत्न केला,” आजोबा म्हणाले, “पण ते ठीक आहे. तुला हव्या तशा कितीतरी गमतीदार गोष्टी आमच्या कुटुंबात दडलेल्या आहेत. आमच्या डांबर-बाळांची गोष्ट तू ऐकलीयस का?”

“डांबर-बाळं?” प्रिया म्हणाली.

“मी तर ती कधी ऐकली नाही बुवा,” हरी म्हणाला.

“तेच तर मी म्हणतो. असंच सरळ पुढच्या पानावर जा. तिथं तुम्हाला छोटा मुलगा दिसेल,” आजोबा म्हणाले, “तो माझा मुलगा सोमू. तो स्वतःही एक डांबर-बाळच आहे. आणि दुसरा किट्टू. म्हणजे माझा भाऊ टिप्पू ह्याचा मुलगा.”

“म्हणजे माझे बाबा?” विश्वास न बसून हरी उद्गारला.

“म्हणजे तोच तू आहेस तर!” कुप्पू आजोबा म्हणाले, “आपली पूर्वी कधी गाठ पडली नव्हती. पण तुझा चेहेरा ओळखीचा वाटला. ठीक आहे. आता पुढच्या पानावर जा. मला माहितीय ती गोष्ट ऐकायला तुम्ही अधीर झाला आहात म्हणून.”

# डांबर-बाळे

सोमू म्हणजे लष्करी टोपी डोक्यावर मिरवणारा सहा वर्षांचा मुलगा ठरला.

"तू डांबर-बाळ आहेस का?" हरीने त्याला विचारले. पण सोमूला तो प्रश्न ऐकूच गेला नाही. तो वळला. त्याने हरी आणि प्रियाकडे चक्क पाठ केली. आणि कोणालातरी हात केला. आपण आता पुन्हा एकदा चित्राचाच भाग झालो आहोत हे प्रियाच्या लक्षात आले. "लहान मुलं असली की आपण असं सामावून कसं घेतले जातो?" तिने हरीला विचारले.

पण हरीने नुसतेच खांदे उडवले. आपल्या अवतीभोवती पाहण्यात तो गुंग आला होता. ते एका मोठ्या अंगणात उभे होते. एका बाजूला मुख्य घर होते. आणि दुसऱ्या बाजूला, मुख्य घराच्या पाठीमागच्या भागात, खोल्या असलेली एक छोटी वास्तू होती. त्यातल्या एका खोलीमधून अजून एक मुलगा बाहेर पडत होता. सोमूने त्यालाच हात केला होता.

"एऽऽ किट्टू" पुन्हा हात करत सोमूने हाक मारली.

किट्टू सोमूकडे येऊ लागला.

आपल्या वडलांची छोटी मूर्ती पाहण्यात हरी नादावून गेला. तो किट्टू साधारण सोमूच्याच वयाचा होता. तो तसा बुटकर आणि दणकट दिसत होता. आणि त्याने चष्मा लावला होता.

"तू कुठं होतास?" सोमूने विचारले, "आणि काय करत होतास?"

"मला काय सापडलं तुला माहितीय?" उत्कंठावर्धक बातमी देत असल्याप्रमाणे किट्टू म्हणाला, "दुसऱ्या खोलीतली कोठी उघडी आहे."

त्याबरोबर सोमूचे डोळे चकाकले." काय आहे तिच्यात?" तो म्हणाला.

"कितीतरी गोष्टी!" किट्टू म्हणाला. त्याचेही डोळे चकाकत होते. "चल, आपण पाहू या."

किट्टूच्या पाठोपाठ सोमू त्या खोलीकडे गेला आणि त्या दोघांच्या पाठोपाठ, पण त्यांच्या नकळत, हरी आणि प्रिया. ती खोली म्हणजे एक गाडीघर होते. त्यात ऑस्टिन कंपनीची मोटारगाडी होती. त्या गाडीघराचा पाठीमागचा भाग आडभिंत घालून वेगळा केला होता आणि त्याचे दार उघडे होते. किट्टू याच कोठीबद्दल बोलला होता.




कोठीच्या आत दोन उंच पिपे, काही मोठे डबे, काही हत्यारे, चारपाच लांब बांबू, शिडी, आणि बऱ्याच इकडच्या तिकडच्या वस्तू होत्या. ही कोठी हरीच्या घरातल्या कोठीसारखीच आहे असे प्रियाला वाटले. पण ती त्याबद्दल काही बोलली नाही.

"त्या पिपात काय आहे तुला माहितीय?" किट्टूने विचारले. प्रश्नाचे उत्तर त्याला आधीपासूनच माहिती आहे हे उघड होते.

"नाही, काय आहे?" पिपाच्या काठावरून आत डोकावून पाहत सोमूने विचारले.

पीप डांबराने अर्धे भरलेले होते. हवा गरम होती आणि डांबर चिकटमाकट होते. सोमूने इकडे तिकडे पाहिले आणि खाचे असणारा खिळा पिळणारा जमिनीवरचा पेचकस उचलला. त्याच्या साह्याने त्याने डांबर थोडेसे घुसळले आणि वरची सायं बाजूला केली. सायीखालचे चकाकणारे घट्टसे काळे द्रव त्यांना आमंत्रण देत होते. भारून गेल्याप्रमाणे सोमूने हातातला पेचकस वर उचलला आणि



भिंतीला डांबर लावले. तो तेथे स्वतःचे नाव लिहू लागला. डांबर तसे घट्ट असल्याने त्याला आपल्या लेखणीचे टोक अनेकदा डांबरात बुडवावे लागले. अखेरीला, किट्टूच्या देखरेखीखाली, त्याने केलेल्या मौलिक सूचनांच्या साह्याने, सोमूचा हेतू साध्य झाला.

"आता माझी पाळी," सोमूचे संपल्यावर किट्टू म्हणाला. त्याने पेचकसाच्या साह्याने पिपातले डांबर जोरात घुसळले. त्याने पेचकस उचलून भिंतीकडे नेला तेव्हा काही डांबर त्याच्या नकळत खाली फरशीवर आणि त्याच्या सदऱ्यावर ठिबकले.

"आई ग!" प्रिया उद्गारली पण अर्थातच ते किट्टूला ऐकू गेले नाही.

भिंतीवर लिहायला सुरुवात करणार तेवढ्यात त्याला वाटले की यापेक्षा काहीतरी वेगळेच तेथे रेखाटावे. म्हणून त्याने तेथे मोटारगाडी काढली आणि मग माणसाची काठी-आकृती काढली. सोमू ते सारे कौतुकाने पाहत होता आणि म्हणाला, "तुला खरंच किती छान चित्र काढता येतं! तू आता जहाज काढतोस का?"

होकार देत किट्टूने पुन्हा एकदा डांबर घुसळले आणि मग तो भिंतीवर जहाज चितारू लागला.

"ते दोघं सगळ्या भिंतीचं वाटोळं करतायत!" प्रिया उद्गारली.

"खरंच हे भयंकर आहे," हरी म्हणाला. लहानपणीच का होईना पण आपल्या वडलांनी अशी कृती करावी याबद्दल त्याला फार संकोच वाटला होता.

"हे जहाज फारच छान आलंय, पण ते थोडंसं वेडंवाकडं वाटतंय," सोमू म्हणाला.

"मी थोड्या लाटा रंगवतो. म्हणजे ते बरोबर दिसेल," किट्टू म्हणाला.

दुसऱ्या पिपाच्या पलीकडच्या बाजूला उभी राहून हरी व प्रिया हे सगळे पाहत होती. आपण बाहेरून काही आवाज ऐकला असे प्रियाला वाटले. पण तिला खात्री नव्हती. नाहीतरी सोमू आणि किट्टू हे दोघेही स्वतःच केवढा तरी आवाज करत होते.

"त्या पलीकडच्या बाजूला तुला चौपाटी काढता येईल," सोमू उत्साहाने म्हणाला.

"नारळाच्या झाडांसकट," किट्टू म्हणाला.

तेवढ्यात कोठीच्या दाराशी कोणीतरी एक उंच आणि उग्र व्यक्ती उभी राहिली. ते पाहून हरी आणि प्रिया पिपाआड लपली. नाहीतरी त्या व्यक्तीचे सारे लक्ष सोमू आणि किट्टूकडे आणि ते चित्र रेघाटत असलेल्या भिंतीकडेच होते. त्या व्यक्तीने एक क्षणभर भिंतीकडे रोखून पाहिले आणि तिथे जी कलाकुसर पाहायला मिळाली ती तिला आवडली नाही हे अगदी उघड होते.

"हे कुणी केलं?" ती ओरडली.

पण त्या व्यक्तीला दारात पाहताच सोमू आणि किट्टू थिजून गप्प उभे राहिले होते. त्या दोघात मिळून एक शब्दही उच्चारला गेला नाही. किट्टूच्या हातातून पेचकस घरंगळला आणि आवाज करत जमिनीवर पडला. सोमूने एकदोन आवंढे गिळले आणि मान हलवण्याचा प्रयत्न केला.

"हे कोण आहेत?" प्रिया कुजबुजली. आपण दोघेही या व्यक्तीच्या दृष्टिआड मोठ्या पिपामागे लपलेले आहोत याचे तिला समाधान वाटत होते.

"मला वाटतं टिप्पू आजोबा," हरीनेही कुजबुजतच उत्तर दिले.

"तुम्हाला रंगवायला आवडतं, नाही का? मलासुद्धा ते आवडतं की," टिप्पू आजोबा संतापाने उद्गारल्याचे त्यांनी ऐकले.

आणि आपल्या पिपाआडून हरी आणि प्रिया यांनी हळूच तिकडे पाहिले तर त्यांना टिप्पू आजोबांनी वाकून तो फरशीवरचा पेचकस वर उचलला आणि डांबरात बुडवला असे दिसले. त्यांनी तो एका झटक्यात वर काढला आणि चटदिशी सोमूच्या दोन्ही गालांवर रेघोट्या चितारल्या. सोमू

मोठ्याने रडू लागला. किट्टूने तेथून पळून जायला प्रयत्न केला. पण तो अयशस्वी ठरला. आणि त्याचेहीं दोन्ही गाल डांबराने चितारले गेले. मग टिप्पू आजोबांनी तो पेचकस खाली फेकला आणि त्या दोन्ही डांबरबाळांचे खांदे पकडून त्यांनी त्यांना कोठीच्या बाहेर चालवले. हरी आणि प्रिया हे



सगळे डोळे विस्फारून पाहत होते. आणि ते तिघे गाडीघराच्या बाहेर पडताच ही दोघेही तेथून बाहेर पडली आणि सुरक्षित अंतरावरून त्यांच्या पाठोपाठ जाऊ लागली.

आजोबांनी किट्टू आणि सोमूला अंगणात सोडले, आणि आपण त्यांना योग्य ती शिक्षा केल्याच्या समाधानात ते तेथून निघून गेले.

एव्हाना सोमूच्या आक्रोशाचा व्हायचा तो परिणाम झाला होता. मुख्य घरातून कितीतरी माणसे बाहेर पडली आणि सोमू व किट्टूभोवती जमून ''काय झालं? 'काय झालं?'' असे विचारू लागली. पण सोमूकडून काहीच उत्तर मिळाले नाही. तो अधिकच जोराने आक्रोश करू लागला एवढेच. याच्या उलट किट्टू लाल चेहऱ्याने नुसता गप्प उभा होता. त्याच्या डोळ्यातून अश्रूंच्या धारा निथळत होत्या आणि चेहऱ्या कपड्यावरच्या डांबराला अधिकच पक्क्या करत होत्या. पण आपण रडतांना सापडायची लाज वाटत असल्याने तो काहीच झालेले नाही असा आविर्भाव चेहऱ्यावर दाखवायचा प्रयत्न करत नुसता उभा होता.



भोवती जमा झालेल्या लोकात हरीची आजीही आहे हे हरीच्या आणि प्रियाच्या लक्षात आले. "अरे किट्टू काय झालं?" मोठ्या काळजीच्या सुरात तिने विचारले.

किट्टूने स्वतःला थोडे सावरून घेतले आणि म्हटले, "बाबा चांगले रंगारी आहेत."

तेवढ्यात पुढच्या फाटकातून एक तरुण आत आला. त्याने अंगात पांढरा कोट घातला होता आणि त्याच्या डाव्या हातातून छाती तपासायची नळी लोंबकळत होती. तो बहुधा डॉक्टर होता किंवा एखादे वेळी डॉक्टर होण्यासाठी शिकत होता. लोकांची ती गर्दी पाहून तो क्षणभर थबकला आणि मग वेगाने पावले टाकत तिकडेच आला.

"मी पैजेवर सांगतो ते थंबूआजोबा आहेत म्हणून," हरी म्हणाला. "मला माहितीय ते डॉक्टर होते म्हणून."

सोमू आणि किट्टूकडे बघितल्यावर थंबूआजोबांना गंमत वाटली. "अरे, यांच्या तोंडाला पिसं चिकटवली नसली तरी डांबर फासलंय की!" ते म्हणाले.

आपल्या अश्रूंमधून त्यांच्याकडे पाहत किट्टू हसला. थंबूकाका त्याचे फार आवडते होते.

"हे कुणी केलं?" त्यांनी त्याला विचारले.

"बाबांनी."

"का?"

"कारण आम्ही कोठीची भिंत रंगवली."

"डांबरानं रंगवलीत?"

"होय."

थंबूआजोबा मनापासून हसले. हसणे संपल्यावर गमतीने म्हणाले, "खोडीला योग्य अशीच शिक्षा आहे."

"होय," किट्टू म्हणाला.

सोमू मोठ्याने रडला.

पाठीमागे कुठेतरी थांबणाऱ्या मोटारगाडीचा आवाज हरी आणि प्रियाला ऐकू आता. त्या गाडीचे शिंगही वाजले. आणि कशावरून तरी त्यांना जाणवले की शिंगाचा तो आवाज अस्वाभाविक आहे—उगीचच मोठा आणि अगदी जवळून होणारा आहे.

# वर्तमानकाळात पुनरागमन

''बाई ग!'' पुन्हा एकदा पुस्तकातून धडपडत बाहेर आल्याचे जाणवून प्रिया उद्गारली.

तिच्या बरोबरच हरीही बाहेर धडपडला होता. ''आपल्याला असं अचानक उडी मारून बाहेर का यावं लागलं?'' जाब विचारावा तसे तो म्हणाला, ''आपण किती रमलो होतो!''

तेवढ्यात मोठ्याने आवाज करत फाटकातून आत येणाऱ्या मोटारगाडीचा आवाज त्यांना ऐकू आला. ''माझे बाबा आले,'' हरी म्हणाला. ''वर्तमानकाळात परतत असताना आपण ऐकला तो आवाज या गाडीचाच असावा.''

त्यांनी खिडकीतून बाहेर पाहिले तो त्यांना बाबा फाटक लावून घराकडे येताना दिसले. तिन्हीसांज झाली होती.

''इतका उशीर!'' प्रिया दचकून म्हणाली, ''माझी आई आता मला चांगलीच रागवेल. मला आता गेलंच पाहिजे.''

ती दोघे घाईघाईने खोलीच्या बाहेर आली आणि प्रिया पळत पळत आपल्या घरी निघून गेली.

आपले बाबा आता कोठे आहेत हे पाहण्यासाठी हरीने आजूबाजूला पाहिले. तर ते स्वच्छ आणि तरतरीत होऊन स्नानगृहातून बाहेर पडत होते.

''तुम्ही डांबर फासलेलं नसतानाच चांगले दिसता!'' तो अनवधानाने उद्गारला.

''डांबर?'' आश्चर्यचकित होत बाबांनी म्हटले.

''नाही, नाही—काही नाही,'' स्वप्नातून जागे होत हरी पुटपुटला.

''प्रिया कुठं आहे? मी तिला चहा देणार होते,'' स्वैपाकघरातून बाहेर येत हरीची आई म्हणाली.

''उशीर झालाय म्हणून ती घरी पळाली,'' हरी म्हणाला.

''तासापूर्वी मी तुम्हाला एका पुस्तकात डोकावून पाहतांना बघितलं,'' आई म्हणाली, ''कोणतं पुस्तक होतं? एखादं कॉमिक?''

हरीला तो प्रश्न ऐकूच गेला नाही. कारण तो तेव्हा पुन्हा एकदा त्या छायाचित्र-संग्रहामध्ये भेटलेल्या काही लोकांच्या विचारात रमून गेला होता. त्याने हळूच आपल्या वडलांकडे पाहिले. आणि थोड्याच वेळापूर्वी दिसलेल्या काटकोळ्या किट्टूच्या मूर्तीतून आताचे इतके भारदस्त दिसणारे बाबा कसे झाले याचे त्याला आश्चर्य वाटले. आणि त्या नादातच नकळत त्याच्या तोंडूनं प्रश्न बाहेर पडला : ''बाबा खरंच का हो तुम्ही लहान असताना तुमच्या बाबांनी तुमच्या गालांना डांबर फासलं होतं?''

बाबा दचकलेच. ''तुला कोणी सांगितलं?'' ते म्हणाले.

''अं—अं—'' हरी घोटाळत म्हणाला, ''मला वाटतं आजीनंच मला ते केव्हातरी पूर्वी सांगितलं होतं.''

''आणि इतक्या वर्षांनंतर तुला ते आता अचानकपणं आठवलं की काय?'' बाबांचा त्यावर विश्वास बसत नव्हता हे उघड होते.


''त्याला काय हरकत आहे?'' हरीने उलट विचारले.

''खोटं नको बोलू. मला खात्री आहे तुला आजच ती गोष्ट कुणीतरी सांगितलीय म्हणून.'' आणि नंतर त्यांनी आईकडे पाहिले.

''मी नाही हं,'' आई ठासून म्हणाली, ''मी दिवसभर कामात गुंतले होते.''

'मी जुना फोटोसंग्रह पाहत होतो,'' हरी म्हणाला, ''त्यावरून मला आठवण झाली.''





"जुना फोटोसंग्रह होय!" त्याचे बाबा उद्‌गारले, "मला कल्पना नव्हती तो अजूनही आपल्याकडं आहे म्हणून!"

जेवण झाल्यानंतर रात्री तो संग्रह पुन्हा एकदा पाहायचा असे हरीने ठरवले होते. पण ती वेळ येईपर्यंत त्याला झोपेने इतके ग्रासून टाकले की तो गादीला टेकतो न टेकतो तोच त्याला गाढ झोपही लागली. ज्या अननुभूत अनुभवातून तो दिवसभरात गेला त्यामुळेच तो इतका थकला असावा. आणि झोपेत बुडत असतानासुद्धा, जे काही घडले त्याचा जादूईपणा त्याच्याजवळ शिल्लकच होता.

मध्यरात्र होत आली तेव्हा काहीतरी जोरात आपटल्याचा आणि खुर्ची ओढल्याचा आवाज ऐकू आल्यामुळे हरीचे बाबा जागे झाले. तो आवाज हरीच्या खोलीतून आल्यासारखा वाटत होता त्यामुळे काय झाले हे पाहायला ते तेथे गेले. आणि तेथे जे पाहायला मिळाले ते बघताच त्यांना फार आश्चर्य वाटले. खिडकीतून चंद्रप्रकाशाचा स्वच्छ पट्टा आत येत होता आणि त्या पट्ट्यात तो जुना छायाचित्र-संग्रह हातात धरून हरी उभा होता.

"हरी," बाबांनी हाक मारली.

पण हरी जागा नव्हता. तो त्या संग्रहासंबंधी स्वप्न पाहण्यात मग्न होता. इतक्या गाढपणे की त्याच्या नकळत तो झोपेतच चालत गेला होता. संग्रह उचलायला गेला तेव्हा तो टेबलावर जोराने आपटला. पण त्यामुळे त्याला जाग आली नव्हती. तो खिडकीकडे चालत गेला तेव्हा वाटेत आलेली खुर्ची त्याने बाजूला ढकलली. पण त्याचीही त्याला जाण नव्हती. आणि तो आता काहीच न पाहणाऱ्या डोळ्यांनी त्या संग्रहाकडे पाहत होता.

हरीचे बाबा त्याच्या जवळ गेले तेव्हा त्याचे डोळे उघडे आहेत आणि तो संग्रहातल्या पानाकडे पाहत आहे ते त्यांच्या लक्षात आले.

त्यांनीही त्या संग्रहात डोकावून पाहिले तेव्हा हरी त्यांच्या आजीच्या छायाचित्राकडे पाहतो आहे हे त्यांना दिसले. त्यांच्याजवळ त्या आजीच्या रम्य आठवणी होत्या. ती शिस्तीच्या बाबतीत तशी कडक होती. पण तरीही फार प्रेमळ होती. आणि आता त्यांनी तिच्याकडे रोखून पाहिले तर ती आपल्याकडे पाहून हसते आहे असे त्यांना वाटले. ते आश्चर्यचकितच झाले.

बारा वाजले हे सांगणारा घड्याळाच्या ठोक्यांचा ठण ठण असा आवाज येऊ लागला. सातव्या आणि दहाव्या ठोक्याच्या दरम्यान, "किट्टू, तूच ना तो बदमाश!" असे आजी म्हणाल्याचे त्यांना वाटले.

त्यांनी अविश्वासाने मान हलवली. मग त्यांनी पुन्हा एकदा त्या छायाचित्राकडे रोखून पाहिले. पण यावेळी त्यांना ते छायाचित्र छायाचित्रे नेहमीच असतात त्याप्रमाणे निश्चल आढळले. आणि त्या चित्रात आजी योग्य रीतीने अगदी टापटिपीने समोर पाहत होती.

हा सगळा आपल्या मनाच्या चित्रविचित्र खेळांचा परिणाम असे बाबांना वाटले. त्यांनी हरीला त्याच्या गादीकडे नेले, त्याला झोपवले, आणि त्याच्यावर नीट पांघरुण घातले. त्यांनी तो छायाचित्र-संग्रह घेतला आणि आपल्या खोलीकडे झोपायला जाताना एका बिनदाराच्या कपाटावरच्या पुस्तकांच्या चळतीच्या मागे टाकला.

दुसऱ्या दिवशी हरी आणि प्रिया यांनी तो संग्रह शोधायचा खूप प्रयत्न केला पण त्यांना तो काही सापडला नाही. "काही हरकत नाही," हरी म्हणाला, "मला तो आज ना उद्या सापडेलच. आणि मग आपल्याला पणजीचा वाढदिवस केव्हा येतोय याचीच फक्त वाट पाहावी लागेल."

"नाही सापडला तरी काही बिघडत नाही," प्रिया उत्साहाने म्हणाली, "पण त्यातली सगळीच

माणसं किती मजेशीर होती नाही?'' आपली सुटी किती गमतीशीर ठरणार आहे हे तिला जाणवू लागले होते. आदल्या दिवशी भेटलेल्या त्या गमतीदार भुतांचाच तो एखादेवेळी परिणाम असावा.

किंवा असेही असेल की तिचा नवा मित्र हरी याच्यातही तो मजेशीरपणाचा अंश शाबूत होता. तिला खात्री होती की आपण दोघे मिळून हा सबंध उन्हाळा अगदी मजेत घालवणार आहोत!

# थोडी वस्तुस्थिती

**प्रकरण 2**

**कॅमेऱ्या (चित्रका) पाठीमागच्या काळ्या कापडात डोकावणारा छायाचित्रकार :** त्या काळी छायाचित्रकलेचे तंत्र हल्लीइतके सुधारलेले नव्हते. हाती असणाऱ्या साधनांत पुरेसे चांगले छायाचित्र काढणे फार अवघड असे. आवश्यकतेइतका अगदी योग्य प्रकाश चित्राफितीवर पडण्याकरता फार काळजी घ्यावी लागे. त्यासाठी कॅमेऱ्याभोवती मोठे काळे कापड पांघरायची तेव्हा पद्धत होती. छायाचित्रकार छायाचित्र काढायच्या वेळी या कापडाच्या आत बाहेर करायचा आणि त्याचे असे हे कापडात डोके घालणे आणि पुन्हा बाहेर काढणे अनेकदा गमतीदार वाटायचे.

**पाच वर्षांची नवरी :** आता काळ बदलला आहे. 1929 साली शारदा कायदा पास करण्यात आला. त्यानुसार लग्न करण्याच्या वेळी मुलीचे वय कमीत कमी चौदा वर्षांचे असायला हवे होते. सध्या कायद्यात अजूनही बदल करून मुलीचे लग्नाचे वय कमीत कमी अठरा करण्यात आले आहे. तरीही अजून काही मागासलेल्या समाजात अनेकदा मुलीचे वय खूप कमी असूनही तिचे लग्न केले जाते.

**मी प्रांतभर अनंतपूर ते कन्याकुमारीपर्यंत प्रवास केला :** जुन्या मद्रास प्रांतात सध्याचे तामिळनाडू आणि सध्याच्या आंध्रप्रदेश व कर्नाटक यांचा काही भाग एकत्रित केला होता. अनंतपूर ते कन्याकुमारी यांच्यात सरळ रेषा काढली तर ते अंतर 750 कि.मी. आहे.

**समाधानी आयुष्याकरता तपेल्यांची आवश्यकता आहे :** वाहतं पाणी सतत मिळत असणाऱ्यांच्या दृष्टीला ही सगळी अतिशयोक्ती वाटेल. तथापि विसाव्या शतकाच्या अखेरीस अशी ही सुविधा आपल्या देशामध्ये फारच थोड्या लोकांकरता उपलब्ध आहे. म्हणूनच पाणी भरून घेता येणाऱ्या बादल्या, तपेल्या किंवा अशाच दुसऱ्या भांड्यांना आपल्याकडे फार महत्व आहे.

**प्रकरण 3**

**हे माझ्या आजोबांचे घर :** भारतामध्ये पूर्वी घरे पारंपरिक वास्तुशास्त्राप्रमाणे बांधली जात. प्रत्येक भागातील हवामानाला योग्य अशी पद्धत वापरली जाई. जवळपास उपलब्ध असलेले बांधकामाचे सामान वापरले जाई. तामिळनाडू आणि आंध्रप्रदेशातल्या काही भागामधली बहुसंख्य जुनी घरे हरीच्या आजोबांच्या घरासारखी असतील.

**प्रकरण 4**

**शेंगदाण्याची आणि तिळाची वडी :** शेंगदाणे आणि तीळ यातले तेल काढून आल्यावर उरलेल्या लगद्याची वडी जनावरांचे खाद्य म्हणून वापरतात.

**प्रकरण 5**

**सांबूला सापडलेले सोने निर्माण करायचे सूत्र :** पाश्चिमात्य जगतात रसायनशास्त्राचा उगम कृत्रिमरीत्या सोने बनविण्याच्या म्हणजे 'अलकेमी'च्या शास्त्रातून झाला. 'अलकेमी' वापरणारे हलक्या दर्जाच्या धातूपासून सोने बनविण्याचा प्रयत्न करीत. सांबू स्वतःचा त्यातलाच एक समजत असावा.

**प्रकरण 7**

**डांबर बाळे :** एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीला जोल शॉंडलट हॅरिस (Joel Chandlet Harris) या अमेरिकी लेखकाने रेमूस काकांच्या (Uncle Remus) अनेक कथा लिहिल्या. त्यातल्या सुरवातीच्या कथांमध्ये डांबर-बाळ हे एक पात्र होते. ब्रेर ससा (Brer Rabbit) आणि ब्रेर कोल्हा (Brer Fox) आणि इतर, यांनी केलेल्या गमतींवर आधरित असलेल्या या कथा अतिशय मनोरंजक आहेत. मळ्यांवर काम करणाऱ्या अमेरिकी निग्रो गुलामांच्या भाषेसारखी भाषा या कथांतली पात्रे वापरतात.

**डांबर फासले पण पिसे चिकटवली नाहीत :** डांबर फासून पिसे चिकटवणे हा एक शिक्षेचा प्रकार आहे. थंबूकाकांनी त्या दोन मुलांचा अवतार पाहिला तेव्हा त्यांना गमतीने वाटले की त्यांना शिक्षा म्हणून डांबर फासण्यात आले असले तरी नशिबाने का होईना पिसे काही चिकटवलेली नाहीत.

*Printed at* J.J. Offset Printers, Patparganj, Delhi-92.

रु. 17.00 ISBN 81-237-3541-3

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया

